REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयातून जीवनकौशल्यांच्या विकसनात येणाऱ्या अडचणी शोधून त्यावरील कृतीकार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे



**श्री. दिपक माळी**
**संशोधक विद्यार्थी**

## १.१ प्रास्ताविक :-

औपचारिक शिक्षणात विद्यार्थ्यांनी स्वानुभवातून शिकावे यासाठी जीवनोपयोगी व जीवन जगण्यास उपयोगी पडणारे अध्ययन अनुभव देणे आवश्यक आहे. म्हणून विविध संस्थांमधील अधिकारी वर्ग व शिक्षकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर युनिसेफच्या मदतीने जीवन कौशल्ये शिक्षण प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण घेतलेल्या तज्ञांच्या परिषद, पुणे या संस्थेने जीवन कौशल्य शिक्षण मार्गदर्शिका, तयार केली. जीवन कौशल्य शिक्षण प्रशिक्षण ही शिक्षकांना देण्यात आले. त्यामुळे जीवन कौशल्ये शिक्षण देवून विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्ये विकसित करण्याची जबाबदारी साहजिकच शिक्षकांवर आली.

## १.२ संशोधनाची गरज :-

औपचारिक शिक्षणात विद्यार्थ्यांनी स्वानुभवातून शिकावे यासाठी जीवनानुभवांशी निगडीत अध्ययन अनुभव देणे आवश्यक आहे. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये WHO ने सुचवलेली जीवन कौशल्ये विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शाळेत अध्यापन करणारे सर्व शिक्षक व शिक्षिका यांना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमांनंतर जीवन कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्याची जबाबदारी शिक्षकांवर आली. परंतु दैनंदिन अध्यापन व दैनंदिन शालेय कार्ये करण्याबरोबर शिक्षकांना जीवन कौशल्ये विकसित करावी लागणार आहेत.

## १.३ संशोधन समस्येचे शीर्षक :-

**इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयातून जीवनकौशल्यांच्या विकसनात येणाऱ्या अडचणी शोधून त्यावरील कृतीकार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.**

## १.४ कार्यात्मक व्याख्या :-

**प्राथमिक शाळा :-** पुणे शहरातील महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळा.
**विद्यार्थी :-** पुणे शहरातील महानगरपालिका प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथीच्या वर्गातील अध्ययनार्थी.
**जीवन कौशल्ये :-** प्राथमिक शाळांतील इयत्ता चौथीच्या मराठी विषयातून रूजवावयाची जीवन कौशल्ये.

**१.५ संशोधनाची उद्दिष्टे :-** मराठी विषयातून साध्य होणाऱ्या जीवन कौशल्यांचा शोध घेणे.
१. मराठी विषयातून जीवन कौशल्ये रूजविण्यात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
२. मराठी विषयातून जीवन कौशल्ये रूजविण्यासाठी कृतीकार्यक्रम विकसित करणे.
३. मराठी विषयातून जीवन कौशल्ये रूजविण्यासाठी तयार केलेल्या कृतीकार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

**१.६ संशोधन प्रश्न :** १. जीवन कौशल्य शिक्षणातील शिक्षकांची भूमिका कोणती?
२. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी जीवन कौशल्य शिक्षणाचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते काय?

३. विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्ये विकसित करण्यात शिक्षकांना कोणकोणत्या अडचणी येतात?
४. इयत्ता चौथीच्या मराठी विषयातून कोणकोणती जीवन कौशल्ये विकसित करता येतील?

**१.७ संशोधन परिकल्पना :**इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयातून जीवन कौशल्य संपादित करताना येणाऱ्या अडचणी शोधून त्यावरील विकसित केलेला कृतीकार्यक्रम राबविल्यास जीवन कौशल्ये अधिक प्रमाणात संपादित होतील.

**१.८ संशोधनाचे महत्व :-**प्राथमिक स्तरावरील जीवन कौशल्ये शिक्षणामधून विकसित करावयाची दहा जीवन कौशल्य या विषयीची माहिती शिक्षकांना होणार आहे. युनिसेफने मार्गदर्शिका केलेल्या या जीवन कौशल्याशिक्षण देण्यामागील अपेक्षा कोणत्या आहेत. याची ही माहिती शिक्षकांना होण्यासाठी या संशोधनाचे महत्व आहे.प्राथमिक शाळेत जीवन कौशल्ये शिक्षण देताना शिक्षकांना व मुख्याध्यापकांना अनेक अउचणी जाणवतात. या अडचणी कोणत्या आहेत, त्या समस्येचे निराकरण कसे करता येईल . हे या संशोधनामुळे शिक्षकांना व मुख्याध्यापकांना समजेल.

**१.९ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**१. प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक शाळांमधील इयत्ता चौथीचाच विचार केला जाणार आहे. २. प्रस्तुत संशोधन इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी विषयातील जीवन कौशल्य घटकापुरते आहे. ३. जीवन कौशल्य विकसनासाठी कृतीकार्यक्रम विकसित करण्यात आलेला असून इयत्ता चौथी मराठी विषयापुरते आहे.

**१.१० संशोधन पद्धती निवडः-** प्रस्तुत संशोधनाचा संशोधन विषय हा वर्तमान काळाशी संबंधित असून तो शालेय घटकाशी संबंधित असल्याने संशोधकाने **प्रायोगिक पद्धती** या प्रकारची प्रस्तुत संशोधनामध्ये निवड करण्यात आली आहे.

**१.११ संशोधन साधन व तंत्राची निवड :-**सदर संशोधनाचे स्वरूप व उद्दिष्टे लक्षात घेऊन संशोधकाने निरीक्षणसूची या साधनाची व मुलाखत या तंत्राची निवड केली आहे.

**१.१२ नमुना निवड :-** पुणे शहरातील महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या वीर बाजी पासलकर प्राथमिक शाळा,पुणे या प्राथमिक शाळांमधील २५ विद्यार्थ्यांची नमुना निवडीतील सहेतूक पद्धतीचा वापर करून निवडण्यात आल्या. या शाळांतील मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या मदतीने इ. ३ री च्या विद्यार्थ्यांचे निरीक्षण करण्यात आले.

**१.१३ उपक्रमांची निर्मिती :** जीवनकौशल्यांच्या रूजवणुकीसाठी खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते.

१. स्वःची जाणीव : स्वतःची ओळख, कुटुंबातील सदस्यांची ओळख , घरात करावयाची कामे यावर चर्चा
२. समानुभूती : मित्राची ओळख, मित्रांच्या अडीअडचणी सोडविणे, मदत करणे.
३. समस्या निराकरण : एखादी समस्या देऊन ती समस्या कशी सोडवायची यावर बुध्दिमंथन , उदाः जत्रेत तुम्ही जर हरवला तर . . . . . . . . .
४. निर्णय क्षमता : शाळेत अचानक आग लागली तर काय कराल?
५. परिणामकारक संप्रेषण : वर्गातील विद्यार्थ्यांबरोबर वेगवेगळ्या विषयावर संवाद
६. सर्जनशील विचार : गोष्ट पूर्ण करणे, नवीन गोष्ट तयार करून सांगणे
७. चिकित्सक विचार : एखादी गोष्ट कशी घडते यावर विचारमंथन

**१.१४ निष्कर्ष :**

उपक्रम राबवण्यापूर्वी केलेल्या निरीक्षणामधून खालील निष्कर्ष आढळून आलेले आहेत.

१. उपक्रम राबवण्यापूर्वी फक्त ४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये स्वची जाणीव मोठ्या प्रमाणात आढळून आले. ३२ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ६४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात स्वची जाणीव आढळून आले.
२. उपक्रम राबवण्यापूर्वी समानुभूती ० टक्के विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. ३६ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ६४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात समानुभूतीची जाणीव आढळून आले.
३. उपक्रम राबवण्यापूर्वी समस्या निराकरण हे जीवनकौशल्य फक्त १२ टक्के विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. ४० टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ४८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात समस्या निराकरण हे जीवनकौशल्य आढळून आले.

४. उपक्रम राबवण्यापूर्वी निर्णय क्षमता फक्त ८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. ३६ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ५६ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात निर्णय क्षमता आढळून आले.
५. उपक्रम राबवण्यापूर्वी परिणामकारक संप्रेषण फक्त १२ टक्के विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. २८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ६० टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात परिणामकारक संप्रेषण आढळून आले.
६. उपक्रम राबवण्यापूर्वी व्यक्तिव्यक्तिमधील सहसंबंध फक्त १६ टक्के विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. ३६ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ४८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात व्यक्तिव्यक्तिमधील सहसंबंध आढळून आले.
७. उपक्रम राबवण्यापूर्वी भावनांचे समायोजन जाणीव फक्त ४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. २८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ६८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात भावनांचे समायोजन आढळून आले.
८. उपक्रम राबवण्यापूर्वी चिकित्सक विचार ० टक्के विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. २४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ७६ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात चिकित्सक विचार आढळून आले.
९. उपक्रम राबवण्यापूर्वी ० टक्के विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील विचार मोठ्या प्रमाणात आढळून आले. १२ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ८८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात सर्जनशील विचार आढळून आले.
१०. उपक्रम राबवण्यापूर्वी ० टक्के विद्यार्थ्यांमध्ये ताणतणावांचे समायोजन मोठ्या प्रमाणात आढळून आले. १६ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ८४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात ताणतणावांचे समायोजन आढळून आले.

**उपक्रम राबवल्यानंतर केलेल्या निरीक्षणामधून खालील निष्कर्ष आढळून आलेले आहेत.**

१. उपक्रम राबवल्यानंतर ५२ टक्के विद्यार्थ्यांमध्ये स्वची जाणीव मोठ्या प्रमाणात आढळून आले. ४० टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात स्वची जाणीव आढळून आले.
२. उपक्रम राबवल्यानंतर समानुभूती ६० टक्के विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. ३२ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात समानुभूतीची जाणीव आढळून आले.
३. उपक्रम राबवल्यानंतर समस्या निराकरण हे जीवनकौशल्य फक्त ४८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. ४८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात समस्या निराकरण हे जीवनकौशल्य आढळून आले.
४. उपक्रम राबवल्यानंतर निर्णय क्षमता ५६ टक्के विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. ४० टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात निर्णय क्षमता आढळून आले.
५. उपक्रम राबवल्यानंतर परिणामकारक संप्रेषण ६० टक्के विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. ४० टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ०० टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात परिणामकारक संप्रेषण आढळून आले.
६. उपक्रम राबवल्यानंतर व्यक्तिव्यक्तिमधील सहसंबंध फक्त ६४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. ३२ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात व्यक्तिव्यक्तिमधील सहसंबंध आढळून आले.
७. उपक्रम राबवल्यानंतर भावनांचे समायोजन जाणीव ६८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. २४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात भावनांचे समायोजन आढळून आले.
८. उपक्रम राबवल्यानंतर चिकित्सक विचार ० टक्के विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. २४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ७६ टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात चिकित्सक विचार आढळून आले.
९. उपक्रम राबवल्यानंतर ८४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील विचार मोठ्या प्रमाणात आढळून आले. १६ टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ०० टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात सर्जनशील विचार आढळून आले.
१०. उपक्रम राबवल्यानंतर ८० टक्के विद्यार्थ्यांमध्ये ताणतणावांचे समायोजन मोठ्या प्रमाणात आढळून आले. २० टक्के विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा प्रमाणात तर ०० टक्के विद्यार्थ्यांमध्ये अल्प प्रमाणात ताणतणावांचे समायोजन आढळून आले.

**शिफारशी :**

१. पाठ्यपुस्तकामध्ये विविध पाठामध्ये जीवन कौशल्य शिक्षण व व्यवहाराची सांगड मोठ्या प्रमाणात घालावी
२. सर्वच शिक्षकांना जीवन कौशल्य शिक्षणाचे प्रशिक्षण द्यावे
३. जीवन कौशल्ये शिक्षणात विद्यार्थ्यांची क्षमता व कुवतीबरोबरच विद्यार्थी वयोगट व परिपक्वता यांचा विचार केला जावा
४. पाठ्यपुस्तकातून जीवनशिक्षण कौशल्यांबाबत जीवनोपयोगी ज्ञान व माहिती व समाजोपयोगी शिक्षण देणारे पाठ समाविष्ठ करावेत
५. शालेय परिसर व पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनात व सहशालेय उपक्रमांच्या माध्यमातून शिक्षकांनी जीवनकौशल्ये शिक्षण द्यावे
६. जीवन कौशल्यांच्या मांडणीत आणखी सलगता आणण्याचा प्रयत्न करावे.

७. प्राथमिक स्तरावर अभ्यासक्रमात अंतर्भूत केलेली जीवन कौशल्यांचे दृढीकरण शिक्षकांद्वारे करण्यात यावे. जीवन कौशल्यांचे दृढीकरण केल्याने विद्यार्थ्यांच्या अंगी जीवन कौशल्यांचा विकास होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होईल.
८. जीवन कौशल्ये शिक्षण मार्गदर्शिका तयार करताना विद्यार्थ्यांच्या वयानुरूप , क्षमतेनुरूप भाषा, चित्रे आशय व मूल्यमापन पद्धती यांचा योग्य विचार करावा.

## संदर्भग्रंथ सूची


1. संपादक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद , पुणे शिक्षक मार्गदर्शिका इ. ३ री ते ४ थी
2. संपादक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद , पुणे जीवन कौशल्य शिक्षण मार्गदर्शिका इ. ३ री ते ४ थी